# “प्रतिभावंत”

सौ.प्रतिभा आचरेकर. उच्चारतानाही अभिमान वाटावा असे हे एक नाव. फक्त नाव की अख्खे गावच ? वाडया-वस्त्यांनी, झाडा-पेडांनी, दऱ्या-डोंगरांनी, राना-माळांनी, फुला-फळांनी, जलाशयांनी, मुला-बाळांनी बहरलेले ! की एक संस्थान ज्ञानाची श्रीमंती मिरवणारे ? की हे सरस्वतीचे मंदीर ? हो. हे मंदीरच. “सरस्वतीच्या निजवासाने धन्य धन्य मी पुण्यधरा”- हे तर त्यांचेच शब्द आहेत. किंवा त्यांच्या मनात नित्य निवास करणाऱ्या शारदेचाच हा उद्‌गार असावा ! १९६५ ते २००८ अशी चार दशकांची समृध्द् लेखन कारकीर्द करणाऱ्या प्रथितयश अशा या विद्वान स्त्री विषयी काही लिहू जाणे म्हणजे माझ्यासारख्याला शिवधनुष्य उचलू पहाण्यासारखेच आहे. या जन्मी काही मोजक्या ठिकाणी जीव अडकला त्यांतले हे एक ठिकाण. या जागांचे देणे फिटता न फिटणारे. तरीही अंशतः उतराई होऊ पाहीन हा अट्टहास .....

सौ. आचरेकरांच्या लेखन कारकीर्दिचा आढावा घेताना त्यांचा एकूण लेखनप्रवास अनेक वेगवेगळया विभागांत विचारात घ्यावा लागेल. एक समर्थ कथालेखिका, एक सक्षम कवयित्री, एक व्यासंगी वृत्तपत्रलेखिका, एक कसबी व्यक्तिचित्रणकार, एक निर्भीड समीक्षक असे त्यांच्या लेखनाचे विविध कप्पे आहेत. कुमारवयापासूनच त्यांनी सातत्याने व विपुल लेखन केले. त्यांचे लेखनविषय उत्स्फूर्त तरीही निवडक, स्थळ-काळानुरूप गरजेचे व वाचकाला काहीतरी देऊन जाणारे आहेत. आजूबाजूच्या अनेक सामाजिक घडामोडींबद्‌दल मनात उमटणाऱ्या असंख्य प्रतिक्रियांना त्यांनी कागदावर मुक्तवाट करून दिलेली दिसते. म्हणूनच त्यांचे गद्य पद्य दोन्ही अंगाचे लेखन अनाठायी न होता आपल्या जागी ठाम व दिशादर्शक ठरते. त्यांच्या अक्षर सामर्थ्याला मराठी सारस्वताच्या दरबारात दखलपात्रच नव्हे तर मानाचे स्थान आहे.

## कविताव्रती

सौ.आचरेकरांच्या काव्याचे रसग्रहण हा निसर्गसुंदर प्रदेशातून रमतगमत फिरण्यासारखा हिरवागार, गर्द झाडीतला अनुभव असतो. कित्येक महान कवी-लेखकांच्या शब्दांतून यापूर्वीच समोर आलेला निसर्ग कितव्यांदा तरी इथे पुन्हा दृग्गोचर होतो. तरीही नव्या अनवट वाटांनी, हिरव्या वळणांनी घनगर्द राईत घेऊन जातो. तिथे मनाला अशी रानभूल पाडतो, की परतीचे दोर कापून टाकल्यागत अवस्था होते.

“राईत गर्द या मोहरला मधुमास
फांद्यांत लटकले मधुर फळांचे घोस
तरूतळी थांबल्या निःशब्द गूढ सावल्या....”
किंवा
“बघ झेपावून आलेच थवे पक्ष्यांचे,
अन् मुकेच बसले भरूनी अंग वृक्षांचे”
किंवा
“रूणझुणते अलगुज केव्हा क्षितीजाच्या शामल ओठी,
त्या स्वरांत भिजली राधा धावत ये कृष्णाभेटी....”

या शब्दांत परतीच्या वाटा पुसून टाकणारे गारूड आहे.

आजकाल ‘शीघ्रकवी’ हे विशेषण हेटाळणीने वा कुत्सिततेने वापरले जाते. खरेतर कवीचे शब्दसामर्थ्य अधोरेखित करणारा हा शब्द आहे. शीघ्रकवी होण्यास फार मोठी साधना, फार मोठा वकूब असावा लागतो. सौ.आचरेकरांमध्ये तो होता. एखाद्या शास्त्रीय गायकाच्या डोक्यात सदैव सूर ‘जुळलेला’ असावा, सतत बॅकग्राऊंडला एखादी धून चालू असावी, तद्वत सौ.आचरेकरांच्या अंतर्मनात कविता सतत खेळत असावी बहुधा. अवचित एखाद् काव्यवस्तू समोर येताच त्यांचे मन **Spontaneous Reaction**ने तत्क्षणी त्याभवती गिरकी घेते. याबाबत एक प्रसंग उद्धृत करण्याजोगा आहे. आचऱ्याच्या प्रसिध्द् रामेश्वर मंदीरात गणपति उत्सवात चलत्चित्र देखावे उभे केले जातात. एका कुशल मूर्तिकाराने एका वर्षी कृष्णचरित्रातला ‘सुवर्णतुले’चा प्लॉट लावला होता. देखाव्यासमोर थर्माकोलच्या बोर्डवर लिहिण्यासाठी त्यांना एखादी समर्पक पद्यपंक्ती हवी होती. कुणी तरी त्यांना सांगितले की बाजूलाच कवयित्री प्रतिभाताईंचे घर आहे. ते मूर्तिकार खूश झाले. लगेच प्रतिभाताईंना भेटायला गेले. सौ.आचरेकर तेव्हा त्यांच्या पेढीवर बसल्या होत्या. गिऱ्हाईकांची गर्दी उसळली होती. तेवढयातूनही लगोलग जाऊन त्या देखावा पाहून आल्या. आणि अगदी क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी कागदावर दोन ओळी लिहून मूर्तिकारांच्या हाती ठेवल्या.

- “भामाहृदयी गर्व उपजला मी तर भार्या श्रेष्ठांची
अहंपणाने तिने घडविली सुवर्णतुला कृष्णाची,
भगवंतांच्या हृदयी जागा खऱ्या भक्तिची, प्रीतीची
चतुर रूक्मीणी म्हणूनि दाविते किमया तुलसीपत्राची”

सौ.आचरेकरांच्या ‘सुवर्णतुला’ या कवितेची जन्मकथा ही अशी आहे.

त्यांच्या ‘जलराशी’ या कवितेची निर्मितिकथाही अशीच विलक्षण आणि विस्मयकारक आहे. नणंदेच्या मुलीच्या लग्नादिवशी तिला सासरी सोडण्यासाठी, वधूची लाडकी मामी या नात्याने सौ.आचरेकर धामापूरला गेल्या होत्या. नववधूने सासरचे माप ओलांडण्यापूर्वी नवे जोडपे धामापूरच्या तलावाकाठी वसलेल्या भगवतीच्या मंदिरात दर्शनास गेले. दर्शन घेऊन नवपरिणित जोडपे बाहेर आले, तेव्हा सौ.आचरेकर तलावाच्या पायऱ्यांवर स्वतःला हरवून बसल्या होत्या. ते पाहून त्यांच्या नववधू भाचीने नवऱ्याच्या खिशातून हळूच छोटासा कागद काढून त्यांच्या हाती दिला. सौ.आचरेकर लिहून गेल्या -

- सायंकाळी जरा टेकता इथे विसाव्याशी,
अशी पावलांपुढे पसरली अथांग जलराशी
....चपळ किशोरीपरी उतरती जळात या पायऱ्या
काठांवरूनी वृक्ष ढाळिती पुष्पांकित चवऱ्या....
....नितळ जळावर सांज दाटता चुकार पक्षी उडे,
या काठावर सुखशांतीचे निधान मज सापडे

धामापूरचा तो प्रसिध्द् तलाव या कवितेत वाकून पहात आहे, की कवयित्रीची प्रतिभा आपले रूपडे या अथांग तळयात निरखून पहाते आहे, काही नकळे.

‘अनामिक’ या काव्यात तर एका सुगंधी स्वप्नानंतर परमेशाचे निर्गुण रूप अशा भावविभोर तऱ्हेने चितारले गेले आहे, की कवीच्या कल्पनेच्या अमर्याद क्षमतेबाबत काही संभ्रम उरू नये.

-“दवबिंदूंच्या आरशात मज कुणी अनामिक दिसला ग .....”

असे त्याच्या दृष्टान्ताचे सुतोवाच करतानाच कवयित्रीचा विवेक ईश्वराच्या अस्तित्वाची रूजवात पटवतो आणि लगेचच

-“कसला विभ्रम कसला संभ्रम चराचरी तो भरला ग,
वेड लावुनी कितीकांना अन् त्रिखंड व्यापून उरला ग”

म्हणत त्याच्या साक्षात्काराचा दिव्यानुभव व्यक्त करतो. एका निर्णयाप्रत येतो. हा शेवटचा निर्णायक क्षण वाचकाला थक्क करतो. सौ.आचरेकरांच्या कवितेने रसिकांना असे कितीतरी वेळा चकित केले आहे. मागल्यादारी प्रतिमांची वखार रचून दर्शनी भागात उगाचच सांकेतिक गूढता मिरवणारे हे काव्य नाही. कवी माधव यांच्या ‘हिरवें तळकोकण’कवितेत साचून राहिलेली कोकणाविषयीची अपार आत्मियता यात आहे. या कविता पत्त्यांमधल्या **Patience**च्या एकटयाने खेळण्याच्या डावाप्रमाणे फक्त कवीच्या समाधानासाठी लिहिलेल्या कुलीन कविता आहेत.

जो विषय मांडण्यासाठी एरवी कविला कागद पुरणार नाही, तो विषय झर्रकन् छोटीशी पद्यपंक्ति होऊन आचरेकरांच्या लेखणीतून क्षणात् बाजूला होतो. अल्पाक्षररमणीयता हे सौ.आचरेकरांच्या कवितेचे बलस्थान आहे. भवतीन्भवती न करता थेट विषयाकडे जाणे त्यांना लीलया साधले होते. त्यासाठी त्यांना कधीही शब्दांची चाचपणी, विनवणी, मनधरणी करावी लागली नाही. बरे शब्द यावेत ते प्रत्येकचवेळी गाणे होऊन, किंवा गाणे होण्यासाठी उत्सुक होऊन. हे तरी किती जणांना साधते ? जन्मतःच चाल मागणारे, ठेका धरणारे शब्द किती लेखण्या प्रसवतात ?

सौ.आचरेकरांची प्रतिभा कुणा थोरामोठयाच्या छायेत थारणारी चीज नव्हती. तरीही त्यांच्या नादमधुर काव्याचा आस्वाद घेताना काही समीक्षकांनी त्यांच्या कवितेवर कविवर्य बा.भ.बोरकरांच्या शैलीची छाप असल्याचे म्हटले आहे. परंतु या बाबत माझे निरीक्षण निराळे आहे. स्वयंस्फूर्त आणि स्वयंपूर्ण असे हे एकटाकी काव्य पूर्णतः स्वावलंबी आहे. वाचकाला खिळवून ठेवण्याची, भूल पाडण्याची त्याची क्षमता मात्र बाकीबाब, पाडगांवकर यांच्या तोडीची आहे. "पाय टाकुनी जळांत बसला, असला औदुंबर" म्हणणाऱ्या बालकवींच्या शब्दांसमोर ही कविता स्नेहादराने लवते. "या नदीच्या पार वेडया यौवनाचे झाड आहे, अमृताचा चंद्र त्याच्या पालवीच्या आड आहे" म्हणणाऱ्या बोरकरांच्या शब्दांभवती ही कविता पिंगा घालते. आणि "क्षाळण्या भूगोल सारा जीवनाचे ओघ आले; आज धारानृत्य चाले" म्हणणाऱ्या पाडगावकरांच्या शब्दांच्या हातात हात गुंफुन अवखळ पोरीसारखी खिदळत निघून जाते. क्षणात गंभीर, क्षणात खटयाळ, क्षणात भावुक, क्षणात हर्षभरित होणारी ही कविता, कवयित्रीच्या स्वभावाशी साधर्म्य साधते. या गुणामुळेच या कविता अभ्यासणाऱ्यास हा चकवा या आधी कोठेतरी अनुभवल्याचे जाणवते एवढेच. वस्तुतः आचरेकरांच्या काव्यातला प्रदेश पूर्णपणे वेगळा आहे. अस्पर्श आहे. अनाघ्रात आहे.

छंदबद्ध, वृत्तसंगत काव्य न करणे (खरेतर न जमणे) हा आज एक अभिमानाचा विषय झालेला दिसतो. 'मुक्तछंदी कवी' हे एक मानाचे सर्टिफिकेटच झाले आहे जणू. वस्तुतः छंदबद्ध काव्यनिर्मितीला सखोल अभ्यास तर लागतोच, परंतु काव्यविषयाच्या अनुभवाची, प्रत्ययाची पातळी अत्यंत उच्च असावी लागते. मणभर ढिसाळ, गढूळ शब्द ओतून ठेवलेले दिसण्यापेक्षा छोट्याशा कडव्यात सोनेरी झालेला कण नजरेत भरावा लागतो. आणि सौ.आचरेकरांची कविता अशा सुवर्णकणांची उधळणच करते.

गण, मात्रा, वृत्ताच्या हिशेबात त्यांची कविता चपखल बसते. या घाटदार कवितेचे मीटर मिली मीटरच्या फरकानेही इकडे तिकडे सरकत नाही. त्यांच्या एकूणच काव्यात एकच विषय दोन तीन वेगवेगळया पध्दतीने निरनिराळया वृत्तांत, छंदात ओवलेला दिसतो. एका विषयाला असा अनेक अंगांनी स्पर्श करण्यालाही विशेष सिध्दि लागते. आणि त्या अर्थाने सौ.प्रतिभा आचरेकर सिध्दहस्त लेखिका होत्या हे निर्विवाद सत्य आहे.

नव्या-जुन्याच्या संगमावर उभी असलेली सौ.आचरेकरांची कविता नव्या पिढीला मार्गदर्शक आणि समीक्षकांना नेहमीच आश्वासक वाटत आली आहे. संस्कृतप्रचुर मराठी, भाषेची उत्तम जाण, शब्दांवरचे निर्विवाद प्रभुत्व, आणि ओघवती वेगवान शैली ही त्यांच्या लिखाणाची वैशिष्टये त्यांच्या काव्याला उच्च साहित्यमूल्य प्रदान करतात. त्यांच्या कविता नेटक्या, सुंदर, उठावदार टाक्यांनी केलेल्या विणकामासारख्या, कागदाच्या पातळीपासून वर उठतात. कागदावर बोट फिरवल्यास त्या बोटांना जाणवतात. कारण हे काव्य खरोखरच त्यांच्या आत्म्याचे स्पंदन असावे !

आजवर अनेक जाणकारांनी सौ.आचरेकरांच्या काव्याची समीक्षा करताना, त्यांच्या लेखन कारकीर्दिला स्पंदनपूर्व व स्पंदनोत्तर अशा दोन कालखंडांमध्ये विभागले आहे. परंतु जास्त सखोल विचार करता त्यांचे एकूणच लिखाण आणीबाणीपूर्व व उत्तर अशा दोन खंडात पाहिले जाणे जास्त संयुक्तिक वाटते. याचे प्रमुख कारण असे, की आणीबाणी पूर्वोत्तर कालखंडात वयाच्या ऐन पंचविशीत असलेल्या पिढीच्या राजकीय, सामाजिक जाणीवा अतिशय तरल आणि तीव्र असलेल्या दिसून येतात. आणि नेमक्या याच कालखंडात सौ.आचरेकरांनी सेवादलाच्या कामात स्वतःला झोकुन दिल्याचे दिसते. तत्कालीन राजकीय अस्थिरतेचे प्रतिबिंब इतर अनेक संवेदनशील व जागरूक लेखकांप्रमाणेच सौ.आचरेकरांच्या लिखाणावरही पडलेले दिसते. त्यांचे या कालखंडापूर्वीचे लिखाण भावुक आणि स्वप्निल आहे. तर या नंतरच्या लिखाणात तत्कालीन सामाजिक समस्यांवर विविध माध्यमातून मार्मिक व खुले भाष्य केलेले आढळते.लाल बहादुर शास्त्रीजींचे आकस्मिक निधन, आणीबाणीतली मुस्कटदाबी, गिरणी कामगारांचा संप व संपानंतरचे दिवस, हुंडाबळीची लागोपाठ घडलेली प्रकरणे, दुष्काळ, स्थलांतरे, मुंबईतले कष्टकरी जीवन, मुंबई बॉम्बस्फोट, केवळ भ्रष्टाचारी व्यवस्थेमुळे माजलेली गरीबी, बेरोजगारी, दैन्य या सगळयाचा प्रभाव त्यांच्या लिखाणावर झालेला दिसतो. याच काळात त्यांच्या लेखनातला स्वैर, निर्व्याज भाव जाऊन त्यात कमालीची प्रगल्भता आलेली दिसते.

परंतु या काव्याचे यथार्थ वर्णन करावयाचे झाले तर सौ.आचरेकरांच्या काव्यात वेग आहे. आवेग आहे. वीजेचे चापल्य आहे. नृत्यांगनेच्या पावलांतले चांचल्य आहे. पावसाच्या पहिल्या शिडकाव्याने रानधुंद झालेल्या मोराचा नृत्याविष्कार आहे. षोडषेचे बाल्य आहे. खळाळत्या निर्झरांचे धावते संगीत आहे. श्रावण झडीचे तुषार वैभव आहे. आषाढ घनाचे सावळे ओथंबलेपण आहे. चैत्राच्या पालवीचे सवाष्ण कोवळेपण आहे. वसंतात गाणाऱ्या कोकिळाचे स्वरमाधुर्य आहे. शिशिराचे पानझडी वैराग्य आहे. ज्येष्ठाच्या मृगचिंब मातीतून डोकावणाऱ्या हिरव्या, पोपटी रेषांचे साकडे आहे. माळरानावर उभ्या पुराणपुरूष पिंपळाचे वृध्दकथन आहे. आम्रवृक्षाची सर्वांगसफलता आहे. पारिजातकाचे शुचिर्भूत सोवळेपण आहे. औदुंबराचे पावित्र्य आहे.

सर्वात महत्वाचे म्हणजे सुबोधता हा या काव्याचा गुणविशेष आहे. अकारण रूपकाच्या मागे धावता धावता धापावून, दमून, थकून गेयता हरवून बसलेली, गद्य आणि दुर्बोध होऊन बसलेली ही कविता नाही. बालपणीच्या पाठ्यपुस्तकात पहिल्यांदा भेटलेल्या, आणि आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यन्त साथ करणाऱ्या ज्या मनात घर बांधून राहिलेल्या कविता असतात, ती या कवितेची जातकुळी आहे. आयुष्याच्या चढ-उतारात निःशब्द साथ करत, मागून येत रहाणारी ही अभिसारिका आहे.

संस्कृतप्रचुर जुन्या लयबद्ध मराठीतून घरंदाजपणे व्यक्त होत आलेली ही कविता

- "धुवांधार पावसाच्या बेबंद कोसळणाऱ्या सरी,
त्यातून आरपार दृष्टि लावुन, मी इथे उन्मुक्त अधीरी"

किंवा

- "कुणी म्हटलंय कुणास ठावुक 'जेलसी दाय् नेम इज वुमन'
खरंच त्याला ठावुक नसेल,
अथांगते तुझं नाव स्त्री .... उन्मुक्तते तुझं नाव स्त्री....."

म्हणत नवकवितेच्या मिनिस्कर्टातही सभ्यपणे फिट् बसते. कवितेचे सर्व फॉर्म्स सौ.आचरेकर सहजतेने वापरतात. त्यांनी कागदावर उभेआडवे, कोणत्याही विषयावर, कसेही लिहिले तरीही ते छापण्याजोगेच असते हे त्यांच्याविषयीचे जवळजवळ सर्वच संपादकांचे ठाम मत. त्यामुळे 'साभार परती'ची पार्सले आचरेकरांकडे कधीही आली नाहीत हे ही एक मजेदार सत्य.

तरीही उपरोक्त कविता अगदी अलिकडच्या काळातल्या. आयुष्याची खडबडीत बाजू रूतण्यापूर्वीच्या, ऐन विशीतल्या निर्भर, बंधमुक्त आयुष्यातल्या त्यांच्या कविता फारच मोहक आणि निर्विष आहेत. एकूणच त्यांची समग्र कविता न्हाऊन घरात वावरणाऱ्या सुवासिनीसारखी सुस्नात आहे.

अशी मुलखावेगळी सौंदर्यदृष्टी घेऊन प्रतिभा जन्माला आल्या, हीच मुळी मराठी रसिकांच्या दृष्टीने मोठी आनंदाची बाब आहे. जीवनाचा रसरसलेला अनुभव त्यांनी काव्याच्या प्याल्यातून भरभरून रसिकांना देऊ केला, ही तर त्याहून आनंदाची गोष्ट. आयुष्याच्या निबिड वनातले झगमगते कोपरे प्रतिभेच्या पंखांवरून मनभावन रंगकळा लेवून आपणापर्यंत आले, हे आपले केवढे मोठे भाग्य.

## कथाकार

खरे तर यशस्वी कवी असतानाच यशस्वी कथाकार असणे, त्यातही पुन्हा उत्तम कथाकथनकार असणे हा चमत्कार आजवर अगदीच अपवादात्मक लोकांनाच साधला आहे. सौ. आचरेकर त्या अजब लोकांच्या पंक्तीतल्या. अठरा-एकोणिसाव्या वर्षापासूनच त्या उत्तम कथा लिहित आल्या आहेत. त्यांच्या कथांना सुरूवातीच्या काळात जरी विषयाचे वावडे नसले तरी नंतरच्या काळात जसजसा सेवादलातला आणि समाजसेवेतला त्यांचा वावर वाढला, तसतशा त्यांच्या कथा नायिकाप्रधान होत गेल्या. इतर विषयांवर किंवा मनोरंजनात्मक लिहित न बसता, आपले कथन स्त्री केंद्रित करून आचरेकरांनी कथा हे माध्यम स्त्रीविषयक समस्यांच्या निराकरणासाठी प्रभावीपणे वापरले. स्त्रीच्या सर्व समस्यांवर, प्रश्नांवर आपल्या पद्धतीने उपाय करू पहाणारी आणि ते न जमलेच तर निदान त्या समस्या धैर्याने समाजापुढे ठेवणारी ही कथा आहे. यातल्या नायिका एकदा ओळखीच्या झाल्यानंतर कायम आपल्याबरोबर रहातात. आजूबाजूला घडलेली एखादी चटका लावून जाणारी घटना ज्या आवेगाने लेखिकेच्या काळजाला भिडली असेल, त्याच आवेगाने ती वाचकांच्या काळजाचा ठाव घेईल एवढी ताकद लेखिकेच्या शब्दांत आणि मांडणीत आहे.

मुख्य म्हणजे, ज्या काळात समाजाचा फार मोठा भाग अद्याप शैक्षणिक, सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेला होता त्या काळात काही वेगळे, आधुनिक आणि एक पाऊल पुढे टाकणारे विचार कथांतून मांडणे धाडसाचे होते. विशेषतः ग्रामीण जनतेला सहजी न पचणारे, क्रांतिकारी विचार देणे तर धारिष्टयाचे होते. तरीही त्या काळात अनेक कथाकारांनी हे दिव्य केले. सौ. आचरेकरांनीही हा वारसा समर्थपणे पुढे चालवला.

त्यांच्या कथांमधला विचार सहज स्वीकारला गेला कारण तो मुळातच कमालीच्या सहजतेने मांडला गेला होता. ग्रामीण अथवा शहरी मध्यमवर्गीय संस्कृतीत, प्रत्येकच स्त्रीलिंगी नाते कसे सोईस्कर लवचिकतेने राबवले जाते हे विषद करणाऱ्या आणि या स्वार्थसाधू, मतलबी पध्दतीच्या कुटुंब व्यवस्थेचा पुनर्विचार करायला लावणाऱ्या या कथा आहेत.

'.....आणि शेवटी ती देशाची पंतप्रधान झाली....' - अशा तऱ्हेने त्यांची कथा कधी संपत नसे. उलट ज्या वर्गाला डोळयासमोर ठेऊन त्या लिहिल्या जात होत्या, त्यांनी त्या वाचून अनुसराव्यात, त्या प्रमाणे वर्तन करावे व छोटे-छोटे बदल घडवीत स्वतःला इतर सुधारलेल्या समाजाच्या बरोबरीस आणावे यासाठी अतिशय सुकर असे शेवटच यातल्या प्रत्येक कथेला दिलेले आहेत. 'शैक्षणिकदृष्टया, आर्थिकदृष्टया अति मागासलेल्या वर्गात व तथाकथित उच्चभ्रू समाजात स्त्री अगदी मुक्त असते. स्वतःचे निर्णय स्वतः घेते. मागचा पुढचा विचार न करता लगेच अंमलातही आणते. प्रश्न असतो तो मध्यमवर्गीय समाजातल्या स्त्रीचाच' हा आचरेकरांचा विचार मला मनोमन पटतो. मध्यमवर्गात स्त्रीची जेवढी घुसमट होते, तशी कुठल्याच वर्गात होत नाही. नवऱ्याचे असंख्य व्याप, मुलांच्या वयांचे, शिक्षणाचे विविध टप्पे, त्यांचे दिनक्रम, बदलत्या काळानुसार त्यांच्या प्रायॉरीटीज् , हे आणि असे बरेच काही तिच्या संपूर्ण सहभागाशिवाय केवळ अशक्यच असते जणू. त्यात तिला चॉईस नाही. ती पाहीजेच. आणि हे सगळे शेवटपर्यंत चालू रहाते. लग्न होऊन एखाद्या घरात येणे म्हणजे लौकिकार्थाने स्वतःला गाडून घेणेच. हा 'थँकलेस जॉब' हसतमुखाने करत रहाणे म्हणजेच आदर्श स्त्री असा सर्वदूर समज. यातून मोकळा श्वास म्हणजे अगदी शेवटचा श्वासच अशीच स्थिती असते. अशा हुतात्मा होऊन जगण्यालाच आपल्याकडे 'सुखाचा संसार' असे संबोधले जाते.

शाळा-कॉलेजात असताना अनेक गोष्टींची आवड असणाऱ्या असंख्य मुली लग्नानंतर अशा अचानक सगळयातून गुडुप झालेल्या मी पाहिलेल्या आहेत. नंतरच्या आयुष्यात त्यांचे नखही दृष्टीस पडणार नाही इतके त्यांना दैनंदिन लहान-लहान गोष्टींमध्ये बुडवून टाकलेले असते. वर्षानुवर्षे कुठेतरी लुप्त झालेल्या काही मुली तर आपल्यापासून अगदी हाकेच्या अंतरावर रहात असल्याचेही काहीवेळा कालांतराने निदर्शनास येते. 'एवढया जवळ रहात असून मधली इतकी सगळी वर्षे त्या कुठेच, कधीच दिसल्या का नाहीत ?' असा प्रश्न केला तर त्या उद्वेगाने म्हणतात -'घरातून कुठली सुटका गुरूजी ?' यांना असे कोण बनवते ? ही मध्यमवर्गीय स्वार्थी मानसिकताच ना ? मुलांना, पतीला, सासरच्या तमाम मंडळींना आणि आश्चर्य म्हणजे तिच्या माहेरच्यांनाही हे जाणवत नाही की आपण एका व्यक्तिशी फारच अन्यायाने वागतो आहोत ; जगण्याचा तिचा हक्क आणि वेळ आपण सगळाच्या सगळा खाऊन टाकतो आहोत.

गृहीणी असणे म्हणजे घरातल्या सगळयांचा बिनपगारी नोकर असणे असेच चित्र पुष्कळ ठिकाणी दिसते. खरे तर प्रत्येक मध्यमवर्गीय घरातली प्रत्येक स्त्री या मुलीप्रमाणेच आपले आयुष्य असेच घुसमटवून घेतलेली असते. तरीही पुन्हा यातली प्रत्येक स्त्री दुसऱ्या स्त्री बाबत इतरांसारखीच बेपर्वाईनेच वागते. आपल्या विचार करण्याच्या, एकमेकांकडे पहाण्याच्या आणि एकमेकांशी वागण्याच्या पध्दतीत किंचितसा बदल जरी केला, तरी या मुलींना त्यांचे आयुष्य पूर्णत्वाने जगता येईल. सौ.आचरेकरांची कथा या मुलींसाठीही आहे आणि या मुलींना असे जखडून टाकणाऱ्या, दुटप्पी मनोवृत्तीच्या तिच्या नव्या नातलगांसाठीही आहे.

समाज परिवर्तनाचा कुठलाही आव न आणता साध्या, सोप्या शब्दांत मांडलेली रोजच्या आयुष्यातल्या कुठल्याशा प्रसंगाची ही कथा एका मोक्याच्या ठिकाणी गाठून मर्मावर घाव घालते. बहुतांश वेळा वाचक हा अचानक त्या कथेची 'नायिका' अथवा 'खलनायक' बनून जातो. हाच क्षण असतो आत्मपरीक्षणाचा आणि परिवर्तनाचा सुध्दा. या कथेतली आपली जागा नेमकी कुठली ? हे एकदा समजले की अंतर्बाह्य बदल हा अपरीहार्य ठरतो. आणि या कामी ही कथा निश्चितपणे यशस्वी ठरते.

## अष्टपैलू

गोष्टीवेल्हाळ तर त्या होत्याच.आसपासच्या शाळांमधून मुलांना गोष्टी सांगण्याची त्यांची सवय फार जुनी. पण इतरही अनेक ठिकाणी त्यांना कथाकथनासाठी बोलावले जाई. 'दूरदर्शन' व 'आकाशवाणी' प्रमाणेच आजूबाजूच्या गावा-शहरांमध्ये त्या समरसून कथाकथन करीत. आवाजातले मार्दव, शब्दांमधला गोडवा, बोलके डोळे आणि भावदर्शी चेहरा एवढया सामग्रीवर त्या कथाकथनाचे मैदान लीलया मारून जात.

कथाकथनाच्या प्रांतात मात्र त्या ज्येष्ठ लेखक व.पु.काळे यांना गुरू मानत. व.पुं.नीही त्यांना अनेकवेळा मार्गदर्शन केले आहे. काळया शाईतल्या गोल गोल सुंदर अक्षरांतली व.पुं.ची उत्साह वाढवणारी पत्रे त्या लहान मुलाने पुस्तकांत रंगीत कागदाचा तुकडा जपून ठेवावा तशा निर्व्याज मनाने जपून ठेवीत.सावंतवाडी येथे कथाकथनासाठी आल्यावर व.पु. त्यांना आवर्जून भेटत व मोठया आत्मीयतेने त्यांच्या लिखाणाचे, वक्तृत्त्वाचे कौतुक करीत. व.पुं.चे व त्यांचे गुरूशिष्याचे नाते पहाणाऱ्यास आनंददायी वाटे.

प्रसन्न मनाचा निगर्वी गुरू अन् बालकासम निकोप मनाची शिष्या अशी ती भेट असे. अशावेळी आपण केवढे मोठे मान्यवर साहित्यिक आहोत या भावनेचा लवलेशही व.पुं.च्या वागण्यात नसे. "प्रतिभा, तुझ्यातल्या कविएवढेच कथाकारालाही जप. त्यातल्या कुणा एकावरही अन्याय झाला तर ते मराठी साहित्याचे नुकसानच असेल. एखाद्याचे एकाचवेळी कवि व लेखक दोन्ही असणे फार दुर्मिळ आहे हो....."-असे सांगताना व.पुं.च्या मनातले कौतुक लपत नसे.

कथाकथनाप्रमाणेच व्यक्तिचित्रणातही मनभावन रंग भरणे त्यांना साधले होते. थोरल्या बंधूंकडून आलेला चित्रकलेचा वारसा त्यांच्या बोटांवर राहून गेलेल्या रंगांप्रमाणे चिकटला होता. जलरंगातील सुंदर पेंटिंग्ज् त्या भराभर पूर्ण करीत. रंगसंगती आणि कुंचल्याच्या चलनाचे उत्तम ज्ञान त्यांना उपजतच होते. काळाच्या ओघात लेखक पुढे जात राहिला आणि चित्रकार कारणपरत्वे कधीमधीच डोकावू लागला ही गोष्ट अलाहीदा. परंतु आत सदैव बंदिस्त झालेला हा चित्रकार कुंचला सोडून त्यांच्या लेखणीत उतरण्याची संधी शोधत बसे.अन् कागद पुढे येताच मनासारखे चित्र रंगवून मोकळा होऊन जाई.आचरेकरांच्या व्यक्तिचित्रणात्मक लेखांत हे चित्रकाराचे अस्तित्व प्रकर्षाने जाणवते. बॅ.नाथ पै, बा.भ.बोरकर, ह.मो.मराठे, सानिया, इस्मत चुगताई, माधवी देसाई, सुनिता देशपांडे, प्रा.मधु दंडवते, मृणाल गोरे, क्रिस्टल पै या आणि अशा अनेक आवडत्या व्यक्तीमत्वांना शब्दबध्द करताना हा चित्रकार त्यांच्यातल्या लेखकाला वरचढ झालेला दिसतो. अनेक वृत्तपत्रांमधून प्रसिध्द झालेले नेटक्या, आकर्षक चणीचे हे लेख आहेत. पण लेख म्हणण्यापेक्षा चित्रे म्हणणे जास्त संयुक्तिक व्हावे असे उत्तम जमलेले आहेत. खरे तर त्यांचे एकूणच लिखाण पोर्टेट किंवा लॅंडस्केपच आहे.

त्या लिहीत्या झाल्या तेच मुळी 'लोकसत्ता' सारख्या नावाजलेल्या, मोठया वृत्तपत्रातून. फार काळ स्थानिक वृत्तपत्रांतून स्वतःला सिध्द केल्यानंतर उशिरा कधीतरी वाटयाला येणारा हा सन्मान. पण सौ.आचरेकरांना तो पहिल्या पावलावरच लाभला. अर्थात कोणत्याही वयातले त्यांचे अक्षरकर्तृत्त्व होतेच मुळी देखणे. 'लोकसत्ते'च्या 'प्रतिभेची पाखरे' या सदरात त्यांच्या काव्याचे प्रथम दर्शन घडले. असे असूनही परिसरात नंतर जन्माला आलेल्या अथवा लहान आवाका असलेल्या वृत्तपत्रांना त्यांनी अव्हेरले नाही. सर्व स्थानिक वृत्तपत्रांशी त्यांचा स्नेह अबाधित राहीला. उलटपक्षी त्यांचा सहभाग या सर्व वृत्तपत्रांना अभिमानास्पदच होता.

*बेळगांव* 'तरूण भारत', 'गोमान्तक'आदि कोकणच्या सर्व दैनिकांमधून त्यांनी सकस लिखाण केले. 'सकाळ'साठी त्यांनी काही काळ बातमीदारी केली. 'पुढारी'साठीही काम केले. त्यांची सदरे, स्फुटलेखन, दीर्घ लेख हे सारेच विशेष म्हणावे असेच असे. त्यांच्या आगामी लिखाणाबाबत वाचकांमध्ये कमालीचे कुतूहल असे.

# सेवाव्रती

आयुष्याकडे पाहण्याची सौ.आचरेकरांची दृष्टी अत्याधुनिक आणि निर्लेप होती. या त्यांच्या निखळ दृष्टीवर कोणत्याही पूर्वग्रहांची अथवा समाजकार्य करताना क्वचित येणाऱ्या वाईट अनुभवांची दूषित पुटे कधी चढू शकली नाहीत. एखाद्या समाजोपयोगी उपक्रमात झोकून देण्याची त्यांची सहजवृत्ती होती. सगळयांना बरोबर घेऊन एखादी चळवळ पुढे नेणे, यशस्वी करणे त्यांना सहजसाध्य होते. शिक्षकी पेशामध्येही विद्यार्थ्यांना शिकवताना त्यांनी जाणीवपूर्वक काही प्रयोग केलेले दिसतात. जुन्यातले चांगले ते उचलून त्याचबरोबर काही नवे करून पाहण्याची वृत्ति आणि धाडस त्यांच्या अंगी होते. नव्हे ते त्यांना जमून गेले होते.

'कवि तो होता कसा आननी' हे पाहण्याची संधी सुदैवाने मला कित्येक साहित्यिकांच्या बाबतीत मिळाली. अनेक कवि लेखकांच्या घरी माझे कामानिमित्त जाणेयेणे होते. अशावेळी अनेकांचे गुणदोष सहज नजरेत भरतात. काही विशेष पाहिलेले विनाकारणच लक्षात राहून जाते. नकळत मनात अनेकवेळा निर्हेतुक तुलनाही होते. नकळतच त्या त्या व्यक्तींबाबत मन काही मते बनवते. त्यात सौ. आचरेकरांच्या बाबतीत जाणवलेला विशेष म्हणजे त्यांच्या बद्दल बराच काळ मी कोणत्याही ठोस निष्कर्षाप्रत येऊ शकलो नव्हतो. एकतर त्यांचे माहेर सावंतवाडीस असल्याने त्यांच्या मातापित्यांशी माझा तसाही फार जुना परिचय होता. सौ. आचरेकरांना अगदी बालवयापासून मी पहात आलो होतो. त्यातही मोठे होता होता त्यांनी साहित्यिक क्षेत्रच कार्यक्षेत्र म्हणून निवडल्याने बरेचसे दुवे, बसण्या उठण्याच्या जवळ जवळ सर्वच जागा समान होत्या.

परंतु सौ.आचरेकरांच्या पहिल्याच संग्रहाचे काम माझ्याकडे असल्याने कित्येकवेळा त्यांच्या सासरी आचरे येथे जाण्याचाही योग आला. विशेषकरून त्यांच्या घरच्या या मुक्कामातच त्यांचे व्यक्तित्व जवळून पाहता आले. यावेळी त्यांच्यातील अनेक व्यक्तिविशेष प्रामुख्याने नजरेत भरले. मनापासून जाणवले ते हे, की त्यांचे व्यक्तिमत्व व्यासपीठानुसार झरझर बदलत असे. म्हणजे असे, की त्या घरी असल्या की पूर्णवेळ गृहीणी असत. त्यांच्या घरी अनेक क्षेत्रांतल्या व्यक्तींचे प्रचंड व सतत येणे जाणे होते. तेवढया सगळया माणसांचे हसत मुखाने करताना त्यांचे प्रतिभासंपन्न साहित्यिक असणे कधी आड येत असल्याचे दिसत नसे. सुरूवातीच्या काळात एक उत्तम शिक्षिका म्हणून कारकीर्द करूनही त्यांच्यात सदासर्वकाळ जगाला शिस्त लावणारी मास्तरीण वास करत नसे. त्यांच्या सासरचा पिढीजात व्यवसाय असलेल्या किराणा पेढीवरचा त्यांचा वावर मात्र काहीसा 'तुकारामी'व्यापाराचा होता असे म्हटल्यास वावगे होणार नाही. प्रत्येक लहान मोठया गिऱ्हाईकाशी व्यक्तिगत सौम्य संवाद हा अगदी हटकून होत असे.

आचऱ्याचे ग्रामदैवत असलेल्या श्री रामेश्वरांचे दर्शनास आलेल्या, परिचयातल्या लोकांचा दुकानात, घरी आवर्जून पाहुणचार होत असे. त्यांच्या सुगंधी व्यवसायात कारखान्यात काम करणाऱ्या प्रत्येक कामगाराशी त्यांचे स्वतंत्र विश्वासाचे नाते होते.

एक बुध्दिवती स्त्री असूनही घराच्या चौकटीत त्या फिट बसत होत्या. त्यांची भावंडे, आई वडील, नणंदा, दीर, भावजया, मुले आणि सख्ख्या-चुलत नात्यातल्या प्रत्येकाशी त्यांची वेगळी जवळीक होती. आजेसासूबाईपासून ते सासूबाई व शिक्षिका असलेल्या आत्तेसासूबाईपर्यंत प्रत्येकीने आखलेल्या आणि चालवत आणलेल्या घरच्या, सणवाराच्या व लोकांच्या आदरातिथ्याच्या परंपरा त्यांनीही उत्साहाने चालवलेल्या दिसत. या सगळयात त्यांच्या निकोप स्वभावाबरोबरच त्यांच्या उत्तम प्रकृतीलाही श्रेय जाते असे मला वाटते. याचे कारण त्यांच्या कुमारवयात त्यांना ज्या उत्साहाने चालता बोलताना मी पाहिले होते, तोच उत्साह त्यांच्या हालचालीत चाळीशी आणि पन्नाशीतही मी पाहीला. त्यांच्यात प्रचंड ऊर्जा होती. त्यांच्या कियाशीलतेचे आणि विपुल लेखनाचे गुपित या गॉड गिफ्टेड उर्जेतच दडलेले असावे बहुधा.

हेवा वाटावा, प्रसंगी मत्सरही वाटावा असे कलेचे दैवी देणे फार फारच कमी लोकांना लाभलेले असते. सौ. प्रतिभा आचरेकर त्या भाग्यवंतांपैकी एक. आपल्या जवळच्या इतर अनेक गोष्टी ठोकरून देऊन उराशी कवटाळून जपावी अशी बावन्नकशी प्रतिभा त्यांना लाभली होती. पण नाभीतली कस्तुरी ओळखून, तिचे योग्य मोल पदरात पाडून घेणे प्रत्येकालाच जमते असे नाही. प्रतिभा आचरेकर त्यातल्याही एक. स्वतःच्या असामान्यत्त्वाची त्यांना जाण नव्हती असे नाही. त्या अलौकिकत्त्वाची किंमत नव्हती असे तर मुळीच नाही. पण दुसऱ्यावर अमर्याद प्रेम करताना स्वतःचे अस्तित्वच हरवून म्हणण्यापेक्षा गमावून बसणारे जे वेडे लोक असतात त्यांच्या रांगेत प्रतिभा आचरेकर अग्रभागी होत्या.

आजुबाजूच्या, नात्यातल्या माणसांमध्ये त्या वाजवीपेक्षा जास्त गुंतल्या होत्या. गृहीणी म्हणून त्यांनी ओढवून घेतलेले असंख्य व्याप त्यांच्या अवघ्या अस्तित्वाला व्यापून राहीले होते. स्वतःतली मोलाची वस्तू जपण्यासाठी त्यांना वेळच उरला नव्हता. स्वतःच्याच लेखनाबद्दल कमालीची बेफीकीरी म्हणा, बेपर्वाई म्हणा त्यांच्यात होती. हृदयातली नाती उधळून देऊन ओंजळीतले देवदत्त पाणीदार मोती जपण्यासाठी प्रसंगी जो पाषाणहृदयी कणखरपणा लागतो त्याचा सौ.आचरेकरांमध्ये पैदाईशी अभाव होता. त्यांची गुणवत्ता मौल्यवान रत्नासम होती. त्यास साजेसे कोंदण देण्यात मात्र त्या अयशस्वी ठरल्या.

त्यांचे आयुष्य थोडे मोकळे असावे असे माझ्यासारख्या कित्येकांना मनोमन वाटे. त्यांच्या सारख्या गुणी कवि-लेखकास थोडी उसंत मिळावी आणि त्यांच्या हातून अधिक रेखिव, अधिक ठाशिव काही घडत रहावे हा उद्देश तर या मागे होताच; परंतु एक व्यक्ती म्हणून आणि हाडामासाचे माणूस म्हणूनही त्यांना जेवढा पसारा उरकावा लागत होता तो अति होतो आहे असे पाहताक्षणीच वाटे. इतरांना जगण्यासाठी मोकळीक देण्याच्या प्रयत्नात त्यांनी स्वतःवर अलिकडच्या काळात फार अन्याय केला असे वाटते.

त्यांच्या घरच्या १९९३च्या त्या अविस्मरणीय पुस्तक प्रकाशन सोहळयानंतर त्यांच्या आत्तेसासूबाईंचे निधन झाले. त्यावेळीही मी त्यांना भेटलो होतो. सारे घरच काहीसे बावरलेले दिसले. परंतु २०००साली त्यांच्या सासूबाई निवर्तल्या आणि उघडया पडलेल्या घराला आपल्या भाबडया हातांनी सावरताना सौ.आचरेकर अगदी गडबडून गेलेल्या दिसल्या. पाहुण्यारावळयांच्या पाहुणचारामध्ये, आदरातिथ्यामध्ये सुगरण असलेल्या त्यांच्या सासूबाईंचा पडद्यामागचा वावर महत्वाचा होता. त्यांचे जाणे संपूर्ण घरालाच विस्कटून गेले. एकूणच या काळात सौ.आचरेकर एकटया पडल्या. कधी जमले तर मीच आचऱ्यास जाऊन त्यांना भेटलो तर. अन्यथा त्यांचे कोठे जाणे येणे थांबल्यासारखेच झाले होते.

परिणामतः या काळात 'अक्षरसिंधु', 'को.म.सा.प.'च्या मंचावरचा त्यांचा वावर बंद झाला आणि त्यांनीच जोपासलेल्या या रोपटयांमधली जान निघून गेली. जनतादल आणि सेवांगणच्या परिसरातही त्यांची अनुपस्थिती जाणवू लागली. त्यांच्या उत्साही सहभागाने या सर्व ठिकाणी एक प्रकारचे चैतन्य भरून रहात असे. या सर्व चळवळींमध्ये काही नवे शिलेदार तयार होत होते. त्यांच्यावरही सौ.आचरेकरांकडून मोलाचे संस्कार घडत होते. ती प्रक्रियाही थांबलीच. एकूणच घरच्या आघाडीवरच्या त्यांच्या अति व्यस्ततेमुळे कोकणच्या साहित्यिक, सांस्कृतिक चळवळीचे मोठेच नुकसान झाले. वैयक्तीकरीत्या त्यांच्यातल्या मान्यताप्राप्त लेखकाचे तर अपरिमित नुकसान या काळात झाले.

लेखनविषय एकदा हातावेगळा झाला की त्याबद्दल निःसंग होऊन जाणारे, त्या निर्मितीशी असलेली नाळ तोडून टाकणारे आणि अनासक्त मनाने पुढे निघून जाणारे जे काही मोजके लेखक होऊन गेले त्या अत्यल्प लेखकांमध्ये सौ.आचरेकरांची गणती होते. स्वतःचे लिखाण घेऊन संपादक, प्रकाशकांकडे जोडे झिजवण्याचे काम त्यांनी केले नाही. कथा-कवितांसाठी जी पत्रे येत त्यातही 'प्रथम येणाऱ्यास प्रथम' या साध्या न्यायानेच त्यांचे काम चाले. त्यात प्रसिध्दि माध्यमाच्या दर्जानुसार, मानधनानुसार, जाडीनुसार अथवा वितरणक्षमतेनुसार डावे-उजवे करण्याचा उद्योगही त्यांनी केला नाही.

कथा, कविता, लेख लिहून झाल्यानंतर कुणा चाहत्याने प्रसिद्धिपूर्वी ते वाचावयास नेले तरी त्यांची काही हरकत नसे . साहित्य प्रसिद्ध होण्यापूर्वी जी किमान काळजी लेखक घेतात तेवढीही त्या घेत नसत . नेलेले साहित्य कुणी परत केले नाही तरी त्यांना खंत नसे . त्या ते पुन्हा जशासतसे लिहीत, अथवा कधी कधी पूर्णतः वेगळे लिहून मोकळया होत . अशावेळी गेलेल्या लेखनाचे काय हा प्रश्न त्यांच्या लेखी गौण असे . अत्यंत अव्यवहार्य अशी ही कृती असे . अर्थात आयुष्य प्रत्येक गोष्टीची किंमत वसूल करतेच . सौ.आचरेकरांच्या या अव्यवहारीपणाची परिणति त्यांच्या साहित्याची हानी होण्यात झालीच . त्यांच्याहून कितीतरी कमी लिहून इतर लेखक दहा वीस पुस्तके गाठीस बांधतात, तेथे विपुल लेखन करूनही सौ.आचरेकर रिक्तहस्तच राहील्या . हे फार वाईट झाले .

## विदुषी

सौ.आचरेकर या अत्यंत विद्वान महिला होत्या . चौफेर वाचन आणि सुदैवाने लाभलेला अनेक क्षेत्रांतल्या थोरामोठयांचा दीर्घ सहवास यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व परिपूर्ण झाले होते . साहित्य,समाज, शिक्षणपद्धति, लग्नव्यवस्था, राजकारण, कला आणि इतर कोणत्याही विषयांवर त्यांच्याशी चर्चेस प्रारंभ केला, तर त्याविषयी बोलण्याजोगे त्यांच्याजवळ पुष्कळ असे . त्यांची स्वतःची अशी काही ठाम मते होती . दुसऱ्याचे बोलणे शांतपणे ऐकण्याची वृत्ती होती . आपले म्हणणे समंजसपणे मांडण्याचा स्वभाव होता . विचारांमध्ये नेमकेपणा होता . एखाद्या प्रसंगात इतरांना न दिसलेली विषयाची दुसरी बाजू त्यांनाच फक्त दिसत असे, असा डोळसपणा त्यांच्याकडे होता . त्या प्रसंगाच्या बऱ्यावाईट परिणामांचे भान होते . मग त्या प्रसंगात सारे जग जरी पलिकडच्या बाजूला असले, तरी आपली बाजू योग्यरीत्या मांडण्याचे धैर्य त्यांच्यात होते . त्यांनी असे धैर्य दाखवून धर्मसंकटातून वाचवलेली कित्येक माणसे आज याची ग्वाही देतील . '......त्यावेळी बाई होत्या म्हणून, नाही तर माझे काही खरे नव्हते......' असे मनमोकळेपणाने कबुल करणारी माणसे तिथे कित्येक मिळतील .

त्यांचे आईवडील प्राथमिक शिक्षक . वडील तर मोठे व्यासंगी . कवीश्रेष्ठ बा.भ.बोरकरांच्या पहिल्या काव्यसंग्रहाचे नाव आपल्या पहिल्या कन्येला त्यांनी मोठया आवडीने ठेवले -'प्रतिभा' . आपल्या मुलीने डॉक्टर व्हावे ही वडीलांची इच्छा . शालेय अभ्यासात प्रतिभा होत्याही अग्रेसर . सावंतवाडी येथील राणी पार्वतीदेवी हायस्कूलच्या मुख्याध्यापिका आदरणीय मीरा धारणकर यांच्या त्या प्रिय विद्यार्थिनी होत . श्री पंचम खेमराज महाविद्यालयातून त्यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण झाले . येथेही कवीवर्य प्रा . वसंत सावंत यांच्या त्या प्रिय शिष्या होत्या .

वडीलांची इच्छा जरी त्यांनी वैद्यकीय शिक्षण घ्यावे अशी असली तरी कुमारवयापासूनच प्रतिभा यांचा ओढा लेखनाकडे राहिला. महाविद्यालयीन जीवनात तर डॉ.वसंत सावंतांच्या सहवासात त्यांच्यातली काव्यवेल जोमाने बहरली. पुढे पणजी येथील चौगुले कॉलेजमध्ये संपन्न झालेल्या आंतर महाविद्यालयीन राज्यस्तरीय काव्य स्पर्धेत प्रतिभा यांना बा.भ.बोरकर यांच्या हस्तेच उत्कृष्ट काव्यनिर्मितिचे पारितोषिक मिळावे हाही एक सुवर्णयोगच म्हणावा लागेल. उत्कृष्ट वाङ्मयनिर्मितिची त्यांची क्षमता निसर्गदत्त होती. त्यांच्याशी बोलताना, आपण एका सुसंस्कृत व्यक्तीशी बोलतो आहोत याची सतत जाणीव रहात असे. विदुषीसह विचारमंथनाचे समाधान त्या चर्चेतुन मिळत असे.

## देवमाणूस

सर्वसाधारणतः ठरवल्या गेलेल्या 'माणूस' या शब्दाच्या व्याख्येला चांगल्या अर्थाने छेद देऊन जगणारी काही जगावेगळी माणसे असतात ज्यांना 'देवमाणूस' असे संबोधले जाते. सौ.प्रतिभा या देवमाणूस होत्या. सामान्यतः ज्यांच्या तोंडून चांगला शब्द अभावानेच निघत असेल अशा आडदांड माणसांनाही सौ.आचरेकरांना 'बाई' किंवा (मालवणीतून) 'बाईनू' अशी हाक मारताना अगदी मृदु झालेले मी पाहीले आहे.

सौ.आचरेकरांचे व माझे संबंध सांत्वनाचे पत्र लिहून स्वस्थ बसण्यासारखे औपचारिक नव्हते. त्यांचे पती श्री.निवृत्तीनाथ व मुले यांना भेटण्यास मी मुद्दाम आचऱ्याला गेलो होतो. सर्व विधि पार पाडून कुटुंबीय मुंबईस निघून गेल्याने भेट होऊ शकली नाही. परंतु शेजाऱ्यांनी माझी विचारपूस केली. सौ.आचरेकरांच्या आकस्मिक निधनानंतर आजूबाजूच्या शाळांमधली अगदी छोटी मुलेही हुंदके देऊन रडल्याचे मला तेथे समजले. सहज त्या चिमण्या पाखरांना या वेदनेबद्दल नेमके काय वाटते हे समजून घ्यावेसे वाटले. परतीच्या वाटेवर शाळेतून परतणाऱ्या या बाळगोपाळांना गाठून मी विचारपूस केली. मुले म्हणाली - "बाई आमका गोष्टी सांगीत. आमका चॉकलेटा देयत. आता आमका कोण नाय ....." हे सांगतानाही ती पुन्हा रडली. माणूसपणातल्या हेव्यादाव्यांचा अजुन स्पर्शही न झालेल्या निष्पाप, कोवळया जीवांचे असे वियोगाश्रू तरी आज कोणाच्या वाटयाला येतात ?

कधी त्या परिसरात त्यांच्या विद्वत्तेचा गंध भरून राहिलेला असे. महादेवाच्या मंदीराला लागून असलेले आचरेकरांचे घर म्हणजे ज्ञानमंदीरच भासे. आता तेथील विषण्ण पोकळी माझ्यासारख्या पूर्ववैभवाच्या साक्षीदारांना सोसवत नाही. आयुष्याच्या संध्याकाली विसाव्याला टेकण्याचे एक मायेचे ठिकाण आता विस्थापित झाले आहे.

## ये हृदयीचे

ही कुणा समीक्षकाची टीका वा स्तुती नाही. हे पितृरूदन आहे. ही एका पित्याची कैफीयत आहे. जगणे अपूर्ण राहून गेलेल्या, पूर्णत्वाने फुलू न शकलेल्या एका कन्येच्या पित्याच्या हृदयीचे हे बोल आहेत. मी सौ.प्रतिभा आचरेकरांच्या वडीलांच्या पिढीचा. पण कन्येच्या खांद्यावरून आनंदाने झुलत पैलथडी जाण्याऐवजी तिच्या श्रध्दांजलीचे भाषण ठोकण्याचे दुर्भाग्य लाभलेला. त्यांच्यासह 'कोकण मराठी साहित्य परिषद्', 'अक्षरसिंधु' , 'सानेगुरूजी कथामाला', स्थानिक आर्ट सर्कल अशा अनेक साहित्यिक-सांस्कृतिक मंचांवर मी वावरलो. ज्यांना त्यांचा स्नेह लाभला त्यांची आयुष्ये उजळून निघाली. अशी सर्वगुणसंपन्न व्यक्ती विरळा.

अपार गुणवत्ता व 'हाती घेईन त्याचे सोने करीन' असे जादुई वरदान लाभलेले असूनही; भौतिक प्रगती आणि अधिकाधिक प्रसिद्धिच्या मागे लागून मुंबई, पुणे, बेळगांव सारख्या योग्यतेनुसार उच्चासन देऊ करणाऱ्या शहरांकडे न धावता त्यांनी कोकणातच कायम वास्तव्य केले हा कोकणच्या लालमातीचा केवढा मोठा गौरव! त्या खऱ्याअर्थाने 'कोकणभूषण' होत्या.

अन्य सर्व सामाजिक व्याप त्यांनी भले कमी केले, परंतु त्यांचे लिखाण मात्र सदैव चालू राहिले. सातत्याने वृत्तपत्रांमधून होणारी त्यांची वाङ्मयीन भेट फार आनंददायी असे. आता ते होणार नाही....

म्हणतात, मनुष्यजन्म एकदाच मिळतो. त्यातही पुन्हा विशेष पुण्यसंचय पदरी असला, तरच सद्संगती घडते. त्या अर्थी मी आणि माझ्याबरोबरचे सौ. आचरेकरांचे अनेक क्षेत्रांतले सहकारी, विद्यार्थी, शिक्षक, वर्गमित्र, शेजारी, कुटुंबीय आणि त्यांचा सहवास लाभलेली प्रत्येक लहानमोठी व्यक्ति परम पुण्यवानच. माझ्याही आयुष्यात आता सावल्या लांबत चालल्या. पुनर्जन्म जर असलाच, तर हेच आयुष्य अगदी सगळेच्या सगळे असेच भगवंताकडे पुन्हा मागून घेईन ! केवळ आयुष्याला लाभलेल्या या प्रतिभावंत स्पर्शासाठी ! ...........

- हरिहर आठल्येकर

(ऑक्टोबर २००८)

*****